[redacted]

**YASHWANT CLASSES** Estd.1995

**Subject:** [redacted]

**Time: 3 Hours** | **July – 2023** | **[Max. Marks: 80]**

## विभाग – १ : गद्य

**प्रश्न १. (अ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) कारणे लिहा. [०२]

(i) रेखामावशींची पावलं आपल्यापेक्षा अधिक सुंदर, चंदेरी आहेत कारण – ...............................................

(ii) स्नेहलने कॉलेजला जाताना सायकल वापरण्याचा निर्णय घेतला कारण – ...............................................

> "काका, हे एक शास्त्रीय सत्य आहे. तुमच्या कार्बन सोडण्याच्या प्रमाणावरून तुमच्या पावलांचा काळा रंग ठरतो. रेखामावशींच्या रोजच्या जगण्यात कार्बन उत्सर्जनाला वावच नाही, म्हणून तर त्यांची पावलं आपल्यापेक्षा अधिक सुंदर, चंदेरी आहेत", सुमित बोलत होता. "बापरे, आपण फरशी घाण होण्याची गोष्ट करतो; पण आपण तर अवघं वातावरणच घाण, प्रदूषित करत असतो. किती प्रचंड कार्बन चिकटलेला असतो, आपल्या पायांना! ग्लोबल वॉर्मिंगला हातभार लावतो आपण. तापानं फणफणलीय आपली धरती, आपल्या पायाला चिकटलेला हा कार्बन आपल्याला धुवायला हवा. मी ठरवलंय, मी कॉलेजला जाताना सायकल वापरणार. मला माझे पाय रेखामावशींसारखे चंदेरी हवेत", स्नेहल गहिवरून म्हणाली.
>
> अभिषेक भारावून म्हणाला, "माझ्या तर कॉलेजसमोरच बसस्टॉप आहे. आजपासून मी बसनंच ये-जा करणार. ठरलं एकदम!"
>
> "खरंय पोरांनो, आजकाल चालणं, सायकल वापरणं विसरूनच गेलोय आपण. अगदी कोपऱ्यावरून भाजी जरी आणायची असली तरी आपण बाईकला किक मारतो आणि पुन्हा व्यायामाकरिता वेगळं मॉर्निंग वॉकचं नाटक करतो. बसनं प्रवास करणं तर आपल्याला कमीपणाचं वाटतं; पण आपल्या पायांना चिकटलेला कार्बन प्रमाणात ठेवण्याकरिता पब्लिक ट्रान्सपोर्ट इज अ मस्ट", अभिषेकचे बाबा म्हणाले.

(२) उत्तरे लिहा. [०२]

(i) अभिषेकने केलेला निश्चय ...............................................

(ii) पब्लिक ट्रान्सपोर्ट वापरण्याची आवश्यकता ...............................................

(३) 'तापानं फणफणलीय आपली धरती' ही स्थिती बदलण्यासाठी उपाय सुचवा. [०३]

**प्रश्न १. (आ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) कृती करा. [०२]

वाघिणीच्या पिल्लांची वैशिष्ट्ये

| | |
|---|---|
| | |

कुत्र्यापेक्षा लहान आकाराची ही वाघिणीची पाच महिन्यांची पिल्लं होती. या वयात लहान मुलं जशी खेळकर असतात, तशीच ही खेळकर होती. एकमेकांचा पाठलाग करणं, मारामारी करणं, पाण्यात उड्या घेणं असे खेळ सुरू झाले. मध्येच आई वळून एखाद्या पिल्लाला मायेने चाटत होती. थोडा वेळ बसल्यावर ती पटकन उभी राहिली. डोकं वळवून तिनं हळूच 'ऑऽवऽ' असा आवाज केला. हा पिल्लांना मागं येण्याबद्दलचा इशारा होता. लगेच वळून ती चालायला लागली. हिनं जंगलात कुठंतरी नक्कीच एखादं सांबर, रानगवा, नीलगाय, रानडुकराची शिकार साधली असावी; पण अशी शिकार जड असल्यानं ती उचलून पिल्लांपर्यंत आणणं शक्य नसतं. त्यामुळं पिल्लांजवळ येऊन घटकाभर पाण्यात बसून तिनं विश्रांती घेतली होती आणि आता ती पिल्लांना त्या शिकारीकडं घेऊन जात होती. या चार पिल्लांसोबतच स्वतःचं पोट भरण्यासाठी तिला सतत कोणती-कोणती शिकार करणं आवश्यकच होतं. त्या कलेत ही चांगली पारंगत होती. वाघिणीनं नाला पार करून बांबूच्या गंजीत पाय ठेवला. आत शिरण्याआधी तिनं वळून पिल्लं सोबत येताहेत की नाही हे पाहून घेतलं. दोन पिल्लं तिच्या मागोमाग निघाली होती; पण दोघांना अद्याप भान नव्हतं.

(२) आकृती पूर्ण करा. [०२]

वाघिणीच्या पिल्लांचे खेळ

| | |
|---|---|
| | |

(३) 'लेखकाला वाघिणीतील आईची झलक जाणवली' हे विधान पाठाच्या आधारे स्पष्ट करा. [०३]

## अपठित गद्य

**प्रश्न १. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) कोण ते लिहा. [०२]

(i) ज्ञानक्षेत्रासाठी व्यक्तिजाणिवांना प्राधान्य देणारे – [ ]

(ii) अविद्या हे सर्व अनर्थाचे मूळ आहे असे सांगणारे – [ ]

शिक्षण हे पवित्र आहे आणि त्याचे पावित्र्य राखण्याची नितांत गरज आहे, अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची श्रद्धा आहे. शिक्षण हा एकूणच मानवी जीवनाचा पायाभूत संस्कार आहे आणि शाळा हे संस्कारकेंद्र आहे. थोर समाजचिंतकांनी 'विद्ये'ला, 'ज्ञाना'ला महत्त्व का दिले याचे इंगित हेच आहे. विद्या जीवनाला वळण देते, सुधारते. विद्येची वाढ होणे सार्वजनिक हितासाठी आवश्यक असल्याचे लोकहितवादींनी प्रतिपादिले होते. नव्या ज्ञानाचे दरवाजे उघडण्यासाठी प्राचीन व्यवस्थेची चिकित्सा करणे त्यांना आवश्यक वाटत होते. गोपाळ गणेश आगरकर नव्या ज्ञानक्षेत्रासाठी व्यक्तिजाणिवांना प्राधान्य देत होते, तर महात्मा जोतीराव फुले यांनी 'विद्येविना मती गेली' असे विद्येचे महत्त्व प्रतिपादून 'अविद्या हे सर्व अनर्थाचे मूळ आहे' असे सांगितले.

(२) विधाने पूर्ण करा. [०२]

(i) शाळा हे ..............................

(ii) 'विद्येविना ..............................'

## विभाग – २ : पद्य

**प्रश्न २. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) चौकटी पूर्ण करा. [०२]

(i) क्षणिक सुख देणारे – [ ]

(ii) चंद्रकिरण पिऊन जगणारा पक्षी – [ ]

(iii) व्यक्तीला सदैव सुख देणारा – [ ]

(iv) चिरकाल टिकणारा आनंद – [ ]

जेवीं चंद्रकिरण चकोरांसी। पांखोवा जेवीं पिलियांसी।
जीवन जैसे कां जीवांसी। तेवीं सर्वांसी मृदुत्व।।

जळ वरिवरी क्षाळी मळ। योगिया सबाह्य करी निर्मळ।
उदक सुखी करी एक वेळ। योगी सर्वकाळ सुखदाता।।

उदकाचें सुख तें किती। सवेंचि क्षणें तृषितें होती।
योगिया दे स्वानंदतृप्ती। सुखासी विकृती पैं नाही।।

उदकाची जे मधुरता। ते रसनेसीचि तत्वतां।
योगियांचे गोडपण पाहतां। होय निवविता सर्वेंद्रियां।।

मेघमुखें अधःपतन। उदकाचें देखोनि जाण।
अधःपातें निवती जन। अन्नदान सकळांसी।।

तैंसे योगियासी खालुतें येणें। जे इहलोकीं जन्म पावणें।
जन निववी श्रवणकीर्तनें। निजज्ञानें उद्धरी।।

(२) आकृती पूर्ण करा. [०२]

योग्याचे मृदुत्व सर्वांशी त्याप्रमाणे

जीवांसी | ............
पांखोवा | ............

(३) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा. [०२]

(i) तृषित = ............ (ii) मृदुत्व = ............

(iii) रसना = ............ (iv) निवविणे = ............

(४) 'योगीपुरुष पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे', हे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा. [०२]

**प्रश्न २. (आ) खालील मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा. [०८]**

| | मुद्दे | 'दोन दिवस' किंवा 'हिरवंगार झाडासारखं' | | |
|---|---|---|---|---|
| (१) | प्रस्तुत कवितेचे कवी/ कवयित्री – | | | [१] |
| (२) | प्रस्तुत कवितेचा विषय – | | | [१] |

| | मुद्दे | 'दोन दिवस' किंवा 'हिरवंगार झाडासारखं' | | |
|---|---|---|---|---|
| (३) | प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ | झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले. | पक्षी झाडाचे कुणीच नसतात तरीही झाड त्यांचं असतं. | [२] |
| (४) | प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश – | | | [२] |
| (५) | प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण– | | | [२] |


## विभाग – ३ : स्थूलवाचन

**प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **[०६]**

(१) 'जाता अस्ताला' या कवितेतील तुम्हांला समजलेली सूर्याची भूमिका स्पष्ट करा.

(२) 'प्रत्यक्ष अनुभवांतून शिकणे हे अधिक परिणामकारक असते' हे विधान 'मोठे होत असलेल्या मुलांनो.....' या पाठाच्या आधारे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(३) खालील मुद्द्यांवर एक परिच्छेद तयार करा.




## विभाग – ४ : भाषाभ्यास

**प्रश्न ४. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

(१) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा. [०२]

(i) माझ्या वडिलांची बदली परत पुण्यास झाली.

(ii) तुम्ही आतापर्यंत किती झाडं लावली?

(२) पुढील वाक्यांत कंसातील सूचनेनुसार बदल करा. [०२]

(i) साहित्याचे रंग खूप आहेत. (उद्गारार्थी करा.)

(ii) रेखामावशींचे पाय स्वच्छ आहेत. (नकारार्थी करा.)

(३) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा (कोणतेही दोन). [०४]

(i) भान ठेवणे (ii) पारंगत असणे (iii) झोकून देणे.

**प्रश्न ४. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**(१) शब्दसंपत्ती.**

(i) विरुद्धार्थी शब्द लिहा. [०१]

सत्य × ..........................., खर्च × ...........................

(ii) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा. [०१]

वाऱ्याचा वेगवान प्रवाह ...........................

(iii) वचन बदला. [०१]

पणती – ....................., दिवस – .....................

(iv) लिंग बदला. [०१]

शिक्षक – ......................, कवी – ...........................

**(२) लेखननियमांनुसार लेखन.**

खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा. [०२]

(i) अब्दूलने एकवार तीच्याकडे बघितले.

(ii) वाळवंटी प्रदेशात वर्षातुन एखादाच पाउस पडतो.

**(३) खालील विरामचिन्हे ओळखा.** [०२]

(i) ‘.........’ – ...........................

(ii) ; – ...........................

## विभाग – ५ : उपयोजित लेखन

**प्रश्न ५. (अ) खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** [०६]

**(१) पत्रलेखन.**

> १० ते १५ ऑक्टोबर
>
> १ ते ८ नोव्हेंबर
>
> अंशुल स्पोर्टस् क्लब, रामदास पेठ, नागपूर
> दिवाळीच्या सुट्टीतील शिबिर
> * मुलामुलींसाठी मोफत फूटबॉलचे
> तंत्रशुद्ध शिक्षण
> *क्रीडासाहित्य मोफत मिळेल
> *तज्ज्ञ मार्गदर्शक संपर्क मो. नं. ९०९९९०९९९९
> anshul70@gmail.com
>
> वेळ
> स. १० ते ५

↓

> वरद/वरदा नाईक
> विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

↓

| | | |
|---|---|---|
| तुमचा मित्र ह्या शिबिरात सहभागी झाला होता त्याबद्दल त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा. | **किंवा** | तुमच्या विद्यालयात शिबिर आयोजित करण्याची विनंती करणारे पत्र मुख्याध्यापकांना लिहा. |

**(किंवा)**

**(२) सारांशलेखन.**

विभाग १ – गद्य (इ) (प्र. क्र. १-इ) मधील अपठित गद्य उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**प्रश्न ५. (आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** [१०]

**(१) जाहिरातलेखन.**

संगणक वर्गाची जाहिरात तयार करा.

**(२) बातमीलेखन.**

नवजीवन विद्यालय, भंडारा या शाळेत शिक्षक दिन साजरा झाला. या कार्यक्रमाची बातमी तयार करा.

**(३) कथालेखन.**

अपूर्ण कथा पूर्ण करा.

आज राहूल अतिशय आनंदात होता कारण त्यांच्या शाळेची सहल पालगड येथे जाणार होती. लवकरच तो शाळेत पोहचला. त्याचे सर्वच मित्र तयारीनिशी आले होते. सहल सुरू झाली. गाडीत सर्वांची मस्ती चाललेली होती. घाटातून गाडी चालली होती. निसर्गरम्य वातावरणाचा आस्वाद सर्व मुले घेत होती. घाटात गाडी एका वळणावर थांबली आणि....

**प्रश्न ५. (इ) लेखनकौशल्य (१०० ते १२० शब्द).**

खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही **एक** कृती सोडवा. [०८]

**(१) प्रसंगलेखन.**

> जनता विद्यालय
> ओझर
> शालेय क्रीडास्पर्धा
> पारितोषिक वितरण समारंभ
> दि. २४ डिसेंबर दु. ४.००
> प्रमुख पाहुणे – श्री. अभय राठोड, क्रीडापटू
> – माजी विद्यार्थी

वरील समारंभास तुम्ही पारितोषिकप्राप्त विद्यार्थी म्हणून उपस्थित होता अशी कल्पना करून त्या प्रसंगाचे लेखन करा.

**(२) आत्मकथन.**

सैनिकाचे आत्मकथन

- सैनिक होण्याचा निश्चय
- खडतर प्रशिक्षण
- शौर्य गाजवण्याची संधी
- ध्येयपूर्ती
- खंत

वरील मुद्द्यांच्या आधारे सैनिकाचे आत्मकथन लिहा.

**(३) वैचारिक.**

मुद्दे – भारतात साक्षरतेची गरज – ग्रामीण भागातील अज्ञान – लिहिता वाचता आल्याचे फायदे – देशाचा विकास – साक्षर देश म्हणून जगात नावलौकिक.

वरील मुद्द्यांच्या आधारे 'साक्षरता – एक अभियान' या विषयावर तुमचे विचार लिहा.

★★★

उत्तरपत्रिका

## विभाग – १ : गद्य

**प्रश्न १. (अ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) कारणे लिहा.** **[०२]**

(i) **रेखामावशींची पावलं आपल्यापेक्षा अधिक सुंदर, चंदेरी आहेत कारण** रेखामावशीच्या रोजच्या जगण्यात कार्बन उत्सर्जनाला वावच नाही.

(ii) **स्नेहलने कॉलेजला जाताना सायकल वापरण्याचा निर्णय घेतला कारण** तिला तिचे पाय रेखामावशी सारखे चंदेरी हवे आहेत.

✲ **(उतारा कृतिपत्रिकेत पाहा.)**

**(२) उत्तरे लिहा.** **[०२]**

(i) **अभिषेकने केलेला निश्चय** आजपासून मी बसनंच ये–जा करणार.

(ii) **पब्लिक ट्रान्सपोर्ट वापरण्याची आवश्यकता** आपल्या पायांना चिकटलेला कार्बन प्रमाणात ठेवण्याकरिता.

**(३) 'तापानं फणफणलीय आपली धरती' ही स्थिती बदलण्यासाठी उपाय सुचवा. [०३]**

**उत्तर:** आधुनिकीकरणामुळे जग बदलत आहे. पर्यावरणही बदलत आहे. सर्वच प्रकारच्या प्रदूषणात वाढ होत आहे यामुळे धरतीचे तापमान वाढले आहे. यासाठी प्रदूषण नियंत्रण करणे हाच ग्लोबल वॉर्मिंगवर उपाय आहे. वृक्ष संवर्धन व वृक्षारोपण केले पाहिजे. सार्वजनिक वाहनांचा वापर करून वातावरणातील कार्बनचे प्रमाण कमी केले पाहिजे. सायकल, वीजेवर चालणारी वाहने यांचा वापर केला पाहिजे. जंगलतोड थांबवली पाहिजे. प्लॅस्टिक, काच, कागद अशा वस्तू पुनर्निमितीसाठी द्यायला हव्यात. रासायनिक खतांचा वापर न करता सेंद्रिय खतांचा वापर केला पाहिजे. विषारी धूर व सांडपाणी सोडणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करणे व पर्यावरणाचा समतोल राखणे हाच तापलेल्या धरतीला थंड करण्याचे उपाय आहेत.

**प्रश्न १. (आ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**(१) कृती करा.** **[०२]**

**वाघिणीच्या पिल्लांची वैशिष्ट्ये**

- कुत्र्यापेक्षा लहान
- खेळकर

**(२) आकृती पूर्ण करा.** **[०२]**

**वाघिणीच्या पिल्लांचे खेळ**

- एकमेकांचा पाठलाग करणे
- पाण्यात उड्या घेणे

**(३) 'लेखकाला वाघिणीतील आईची झलक जाणवली' हे विधान पाठाच्या आधारे स्पष्ट करा.** **[०३]**

**उत्तर:** 'आई' या शब्दातच वात्सल्य दिसून येते, मग ते मनुष्य असो वा प्राणी. प्रत्येक आई आपल्या मुलाची जिवापलीकडे काळजी घेत असते. म्हणूनच शिकारीसाठी जाताना वाघीण आपल्या पिल्लांना दाट झुडपात लपवून ठेवत असे. पिल्लांच्या उधाणाने आईच्या उत्साहाला उधाण येत असे. त्यांच्याबरोबर खेळणे, पिल्लांना इशारा देणे, त्यांनी मस्ती केली तरी गप्प बसून सहन करणे, त्यांचे रक्षण करणे, पोट भरणे या सर्व गोष्टीतून लेखकाला वाघिणीत आईची झलक दिसते.

## अपठित गद्य

**प्रश्न १. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) कोण ते लिहा.** **[०२]**

**(i) ज्ञानक्षेत्रासाठी व्यक्तिजाणिवांना प्राधान्य देणारे –** गोपाळ गणेश आगरकर

**(ii) अविद्या हे सर्व अनर्थांचे मूळ आहे असे सांगणारे –** महात्मा जोतीराव फुले

* **(उतारा कृतिपत्रिकेत पाहा.)**

**(२) विधाने पूर्ण करा.** **[०२]**

**(i) शाळा हे** संस्कारकेंद्र आहे.

**(ii) 'विद्येविना** मती गेली'

www.yashwantclasses.in

## विभाग – २ : पद्य

**प्रश्न २. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) चौकटी पूर्ण करा.** **[०२]**

(i) क्षणिक सुख देणारे – उदक

(ii) चंद्रकिरण पिऊन जगणारा पक्षी – चकोर

(iii) व्यक्तीला सदैव सुख देणारा – योगीपुरुष

(iv) चिरकाल टिकणारा आनंद – स्वानंद

✲ (कविता कृतिपत्रिकेत पाहा.)

**(२) आकृती पूर्ण करा.** **[०२]**

**योग्याचे मृदुत्व सर्वांशी त्याप्रमाणे**

- **जीवांसी**
- जीवन
- **पांखोवा**
- पिलियांसी

**(३) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा:** **[०२]**

(i) **तृषित** = तहानलेला

(ii) **मृदुत्व** = मऊपणा

(iii) **रसना** = जीभ

(iv) **निववणे** = संतुष्ट करणे

**(४) 'योगीपुरुष पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे', हे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.** **[०२]**

**उत्तर:** योगीपुरुष जन्माने आपल्यासारखेच सामान्य असतात. त्यांच्या जीवनशैलीने ते स्वत:च्या मनावर नियंत्रण ठेवतात. त्यांचे कार्य त्यांच्यातील असामान्यत्व दाखवते म्हणून आपण त्यांना 'योगी' म्हणतो.

अभंगात त्याची तुलना पाण्याशी केली आहे. पाण्यामुळे आपल्या शरीरावरील मळ स्वच्छ होतो, त्यामुळे फक्त शरीर स्वच्छ होते, परंतु योगी-संत यांच्या सहवासाने मन स्वच्छ होते आणि मन स्वच्छ झाले की सन्मार्ग मिळतो. त्यामुळेच आपले जीवन सुखी होते. म्हणजेच मन स्वच्छ असणे हे शरीर स्वच्छ असण्यापेक्षा श्रेष्ठ आहे. म्हणूनच म्हणतात, योगी पुरुष पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे.

**प्रश्न २. (आ) खालील मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा.** **[०८]**

**'दोन दिवस'**

**(१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री.** **[०१]**

**उत्तर:** नारायण सुर्वे

**(२) प्रस्तुत कवितेचा विषय.** **[०१]**

**उत्तर:** कष्टकरी वर्गाच्या कष्टमय आयुष्याकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी.

**(३) प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ**

**झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले.** **[०२]**

**उत्तर:** 'दोन दिवस' या कवितेत कवी नारायण सुर्वे यांनी कामगारांच्या आयुष्यातील दाहकता व जीवनाचे वास्तव चित्रित केले आहे. गरिबी, दुःख, दारिद्र्य अवस्थेत जीवन जगत असलेल्या कामगाराचे आयुष्य झोतभट्टीतील पोलादासारखे असते. भट्टीत पोलाद शेकते तसे मी माझे संघर्षाने आयुष्य शेकून घेतले आहे. बऱ्यावाईट प्रसंगांच्या आगीतून मी तावून सुलाखून निघालो आहे.

कामगारांचे जीवन असेच आगीत होरपळून निघत असते.

**(४) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश.** **[०२]**

**उत्तर:** जीवनातील कटू अनुभवांच्या शाळेत दु:ख पचवून जगण्याची शिकवण मिळते. माणसाचे दोन दिवस सुखाच्या प्रतिक्षेत व दोन दिवस दु:खात जातात. जीवनात फक्त अश्रूंची साथ राहते. हे सत्य मांडत असताना कष्टकरी संघर्षमय जीवन जगण्याचा संदेश मिळतो.

**(५) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण.** **[०२]**

**उत्तर:** 'दोन दिवस' या कवितेत संघर्षमय जीवनाचे सत्य मांडले आहे. हे भीषण जीवन सत्य मांडताना दु:ख पचवून जगण्याची शिकवण मिळते. तसेच साधी/सोपी रचना असून बोलीभाषेशी जवळीक साधणारी असल्यामुळे ही कविता आवडली.

**किंवा**

**'हिरवंगार झाडासारखं'**

**(१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री.** **[०१]**

**उत्तर:** जॉर्ज लोपीस

**(२) प्रस्तुत कवितेचा विषय.** **[०१]**

**उत्तर:** मानवाचे जीवन हे झाडासारखे परोपकारी व प्रसन्न असावे. कठीण प्रसंगी घट्ट पाय रोवून उभी राहण्याची वृत्ती हा गुण माणसात असावा हा विषय कवितेत मांडला आहे.

**(३) प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ.** **[०२]**

पक्षी झाडाचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं

**उत्तर:** झाडाचे महत्त्व, झाडाची सहनशीलता, परोपकारी वृत्ती, संकंटात उभी राहण्याची जिद्द या सर्व गुणांचे महत्त्व कवी जॉर्ज लोपीस यांनी 'हिरवंगार झाडासारखं' या कवितेत मांडले आहे.

झाडावर पक्षी विसाव्याला येतात, थांबतात व निघून जातात. पक्षी झाडांचे मित्र नसतात तरीही झाड पक्ष्यांसाठी सदैव उभे असते.

**(४) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश.** **[०२]**

**उत्तर:** 'हिरवंगार झाडासारखं' या कवितेत कवी जॉर्ज लोपीस यांनी माणसाचे जीवन हे झाडासारखे हिरवेगार व प्रसन्न असावे असा संदेश दिला आहे. झाडाची सहनशीलता, दातृत्व, सहकार्याची भावना, कठीण प्रसंगातही घट्ट पाय रोवून उभे राहण्याची वृत्ती इत्यादींचे वर्णन करून आपणही हे गुण बाणवावेत हा मोलाचा संदेश दिला आहे.

**(५) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण.** **[०२]**

**उत्तर:** 'हिरवंगार झाडासारखं' ही कविता झाडाच्या रूपातून माणसाला जीवनात कसे वागावे याचा संदेश देते. झाड जगत असताना ऊन, पाऊस, वारा, वादळ यांच्याशी झुंज देत खंबीरपणे उभे असते. त्याप्रमाणे माणसांनी जीवनात निर्धाराने उभे राहावे. झाडासारखी परोपकारी वृत्ती, सहनशीलता, दातृत्व हे गुण समजून घेऊन ते अंगी बाणवावेत, असा संदेश मिळतो म्हणून मला ही कविता आवडली.

## विभाग – ३ : स्थूलवाचन

**प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **[०६]**

**(१) 'जाता अस्ताला' या कवितेतील तुम्हांला समजलेली सूर्याची भूमिका स्पष्ट करा.**


**उत्तर:** 'जाता अस्ताला' ही मूळ कविता गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची असून त्याचे स्वैर रुपांतर श्यामला कुलकर्णी यांनी केले आहे. या कवितेतून कवीला हे जाणवून द्यायचे आहे की, या विश्वातील छोटीशी वस्तू किंवा जीव देखील सर्व जगाला उपयोगी आहे. वरील विधानाचे जिवंत उदाहरण म्हणजे सूर्य अस्ताला जाताना सूर्याच्या मनात येणारे विचार 'आपण अस्ताला गेल्यावर या विश्वाचे काय होईल?' आणि पूर्ण विश्वाची जबाबदारी घेणारी पणती ही होय.

थोडक्यात काय, तर सूर्याने दिवसभर विश्वाला प्रकाशित केले, आणि अस्ताला जाताना आपल्या ऐवजी पर्यायी व्यवस्था आहे याची खात्री करून घेतली. अशी सूर्याची भूमिका आहे.

(२) 'प्रत्यक्ष अनुभवांतून शिकणे हे अधिक परिणामकारक असते' हे विधान 'मोठे होत असलेल्या मुलांनो.....' या पाठाच्या आधारे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

**उत्तर:** लेखक डॉ. भाभा ट्रेनिंग स्कूलमधील प्रशिक्षण संपवून बार्क मध्ये इंजिनियर म्हणून काम करू लागले तेव्हा मेटलायझिंग प्रक्रियेवर त्यांना काम करा, असे सांगण्यात आले. त्यांच्याकडे यंत्रसामग्री होती, पण कोणीच ती वापरली नव्हती. त्यांनी त्यावर काम करण्याची तयारी दाखवली. त्यासाठी त्यांना एक वेल्डर व फोरमनची आवश्यकता होती. त्यांना मदत मिळाली नाही. सर्व काम त्यांनी स्वत: केले. वरिष्ठांची आज्ञा म्हणून काम पूर्ण केले. कामाची व्याप्ती वाढली. नंतर त्यांना मदत देण्याची तयारी वरिष्ठांनी दाखवली. पण त्यांनी मदत घेतली नाही. स्वत: अनुभवातून शिकले व त्यावेळी त्यांच्या लक्षात आले, की प्रत्यक्ष अनुभवातून शिकणे हे अधिक परिणामकारक असते. अनुभवासारखा दुसरा गुरु नाही. स्वतः ज्यावेळी काम करतो त्यावेळी प्रत्यक्ष अनुभव प्राप्त होतो व तो अनुभव नेहमीच आपल्याला प्रेरणादायी ठरतो. यामुळे काम करण्याची क्षमता व विश्वास वाढतो.

(३) खालील मुद्द्यांवर एक परिच्छेद तयार करा:




**उत्तर:** व्युत्पत्ती म्हणजे एखाद्या शब्दाच्या किंवा अर्थाच्या मुळाचे ज्ञान. अशा अनेक शब्दांच्या व्युत्पत्तींचा संग्रह म्हणजे व्युत्पत्ती कोश. १९३८ साली मुंबई येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर हे या संमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांनी या व्युत्पत्ती कोश रचनेचे कार्य हाती घ्यावे, असा ठराव संमेलनात मंजूर झाला. कृ. पा. कुलकर्णी यांच्यावर या कामाची जबाबदारी सोपवण्यात आली. बॅरिस्टर मुकुंदराव जयकर यांच्या आर्थिक सहकार्यामुळे व श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर यांनी पुरस्कृत केल्यामुळे व्युत्पत्ती कोशास भरीव मदत झाली. सन १९४६ साली या मराठी व्युत्पत्ती कोशाचे पहिले प्रकाशन झाले.

## विभाग – ४ : भाषाभ्यास

**प्रश्न ४. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

**(१) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.** [०२]

**(i) माझ्या वडिलांची बदली परत पुण्यास झाली.**

**उत्तर:** विधानार्थी वाक्य

**(ii) तुम्ही आतापर्यंत किती झाडं लावली?**

**उत्तर:** प्रश्नार्थी वाक्य

**(२) पुढील वाक्यांत कंसातील सूचनेनुसार बदल करा.** [०२]

**(i) साहित्याचे रंग खूप आहेत. (उद्गारार्थी करा.)**

**उत्तर:** किती रंग आहेत साहित्याचे!

**(ii) रेखामावशींचे पाय स्वच्छ आहेत. (नकारार्थी करा.)**

**उत्तर:** रेखामावशींचे पाय अस्वच्छ नाहीत.

**(३) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही दोन).** [०४]

**(i) भान ठेवणे** – जाणीव ठेवणे

**(ii) पारंगत असणे** – तरबेज असणे

**उत्तर:** विजय आधुनिक पद्धतीने शेती करण्यात पारंगत आहे.

**(iii) झोकून देणे** – पूर्णपणे सहभागी होणे.

**उत्तर:** महात्मा गांधीजींनी आपले आयुष्य देशसेवेसाठी झोकून दिले होते.

**प्रश्न ४. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**(१) शब्दसंपत्ती:**

**(i) विरुद्धार्थी शब्द लिहा.** **[०१]**

(अ) सत्य × असत्य (ब) खर्च × जमा

**(ii) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** **[०१]**

वाऱ्याचा वेगवान प्रवाह – झोत

**(iii) वचन बदला.** **[०१]**

(अ) पणती – पणत्या (ब) दिवस – दिवस

**(iv) लिंग बदला.** **[०१]**

(अ) शिक्षक – शिक्षिका (ब) कवी – कवयित्री

**(२) लेखननियमांनुसार लेखन.**

**खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.** **[०२]**

**(i) अब्दूलने एकवार तीच्याकडे बघितले.**

**उत्तर:** अब्दुलने एकवार तिच्याकडे बघितले.

**(ii) वाळवंटी प्रदेशात वर्षातुन एखादाच पाउस पडतो.**

**उत्तर:** वाळवंटी प्रदेशात वर्षातून एखादाच पाऊस पडतो.

**(३) खालील विरामचिन्हे ओळखा.** **[०२]**

**(३) खालील विरामचिन्हे ओळखा.** **[०२]**

**उत्तर:** (i) ‘.........’ – एकेरी अवतरण चिन्ह

(ii) ; – अर्धविराम

## विभाग – ५ : उपयोजित लेखन

**प्रश्न ५. (अ) खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **[०६]**

**(१) पत्रलेखन.**

**※ (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:**

दिनांक: २३ डिसेंबर, २०२३.

प्रिय मित्र हितेंद्र,

सप्रेम नमस्कार.

बरेच दिवस झाले तुझे पत्र नाही व खुशाली समजली नव्हती. कालच आपले क्रीडा शिक्षक विजय सरांकडून तुझ्या फूटबॉलच्या अप्रतिम खेळाची माहिती मिळाली.

अंशुल स्पोर्टस् क्लब, रामदास पेठ, नागपूर येथे १० ते १५ वयोगंटातील फूटबॉल शिबिरात तू सहभागी झाला होतास याबद्दल तुझे हार्दिक अभिनंदन. अत्यंत तंत्रशुद्ध फूटबॉलचे प्रशिक्षण तू घेतलेस व प्राविण्य संपन्न केलेस असे समजले.

हितेंद्र! खेळ हा तुझा श्वास आहे. अभ्यास करून खेळातही तू नेहमीच अव्वल राहिला आहेस यामुळे तू सर्वांनाच आवडतो. तुझ्या या शिबिरात घेतलेल्या ज्ञानाचा आम्हा मित्रांनाही नक्कीच फायदा होईल अशी अपेक्षा.

यशस्वीरीत्या शिबिर पूर्ण केल्याबद्दल पुन:श्च हार्दिक अभिनंदन.

तुझा मित्र,
वरद नाईक,
रामदास पेठ, नागपूर – ४४०००१.
ई–मेल आयडी – anshul70@gmail.com

**(किंवा)**

**उत्तर:**

दिनांक: २ ऑक्टोबर, २०२३.

प्रति,
माननीय मुख्याध्यापक,
हंसराज मोरारजी स्कूल,
रामदास पेठ,
नागपूर – ४४०००१.

**विषय:** क्रीडा शिबिर आयोजन करण्याबाबत.

माननीय महोदय,

सप्रेम नमस्कार,

अंशुल स्पोर्टस् क्लब, नागपूर यांच्यातर्फे दरवर्षी दिवाळीच्या सुट्टीत मुला-मुलींसाठी फूटबॉल शिबिराचे आयोजन करण्यात येते. या वर्षी सुद्धा दिनांक ०१ ते ०८ नोंव्हेंबर या काळांत १० ते १५ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी मोफत फूटबॉलचे शिबिर आयोजित केले आहे.

फूटबॉलचे तंत्रशुद्ध शिक्षण व मोफत क्रीडासाहित्य या शिबिरात देण्यात येणार आहे. क्रीडा विषयाचे तज्ज्ञ मार्गदर्शक यावेळी उपस्थित राहणार आहेत.

आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना दिवाळीच्या सुट्टीत या शिबिराचा लाभ घेता येईल. विद्यार्थ्यांची सुट्टी आनंदात जाण्यासाठी आपणही आपल्या शाळेत फूटबॉल शिबिरांचे आयोजन करावे ही नम्र विनंती.

माझ्या या विनंती अर्जाचा विचार करून लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करावी.

आपला नम्र,

वरद नाईक,

(विद्यार्थी प्रतिनिधी)

रामदास पेठ, नागपूर - ४४०००१.

ई-मेल आयडी - anshul70@gmail.com

**(किंवा)**

**(२) सारांशलेखन.**

**※ (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:** डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शिक्षणानेच मानवी जीवनाचा पाया रचला आहे. शाळा हे संस्कार केंद्र आहे. लोकहितवादी, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा जोतीराव फुले यांसारख्या थोर समाजचिंतकांनी विद्येचे महत्त्व समजावून सांगितले आहे.

**प्रश्न ५. (आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **[१०]**

**(१) जाहिरातलेखन.**

**※ (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:**

खास सवलत
₹ २५००/- फी

**सत्यम् कॉम्प्युटर क्लासेस**


**शिका आणि प्रगती करा**

वर्ग सर्वांसाठी खुला
स्त्री/पुरुष

तुमचा एक निर्णय तुमचे भविष्य घडवू शकतो

आमचे सर्टिफिकेट कोर्स

MSCIT, DTP, Online Advertising.
Website Designing & Internet Marketing



**पत्ता** – जितेंद्र महाजन, ४/महावीर हाऊस,
म्हाडा कॉलनी, चारकोप, कांदिवली, मुंबई – ४०००६७.

तंत्रज्ञानाशी
मैत्री

**वेबसाइट** – *www.mjtcomputer.com*

मर्यादित प्रवेश

संगणक साक्षरता काळाची
गरज

**वर्गाची वेळ** – सोमवार ते शनिवार

सकाळी ९.०० ते रात्री ८.०० पर्यंत

त्वरा करा! त्वरा करा! त्वरा करा!

**(२) बातमीलेखन.**

**※ (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:**

**शिक्षक दिन संपन्न**

दिनांक: ६ सप्टेंबर, २०२३.

आमच्या वार्ताहराकडून,

वर्तमान पिढीला मार्गदर्शन करून नवीन पिढी तयार करण्याचे व देशासाठी आदर्श नागरिक घडवण्याचे कार्य शिक्षक करतात, असे प्रतिपादन कॅप्टन गोविंद राजन श्रीनिवासन यांनी केले.

भंडारा येथील नवजीवन विद्यालयाच्या शाळेत संपन्न झालेल्या कार्यक्रमाला शिक्षक दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित होते. या दिवशी शाळेचे सर्व कामकाज विद्यार्थ्यांनी सांभाळले. शाळा संपल्यानंतर शाळेच्या सभागृहातच विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. नृत्य, संगीत, मिमिक्री व नाट्य अशा भरगच्च मेजवानीने भरलेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमार धर्मेंद्र द्विवेदी यांनी केले.

सदर कार्यक्रमास शाळेतील विद्यार्थी व माजी विद्यार्थीही मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका स्वप्ना शेट्टी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून मार्गदर्शनपर भाषण केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**(३) कथालेखन.**

**✲ (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:** **अविस्मरणीय सहल**

निसर्गरम्य वातावरणाचा आस्वाद सर्व मुले घेत होती. घाटात गाडी एका वळणावर थांबली आणि क्षणार्धात गाडीत स्तब्धता पसरली, कारण बसच्या ड्रायव्हरने अचानक बसला ब्रेक लावला होता. वळणावर असलेल्या धबधब्याजवळ बघ्यांची फार मोठी गर्दी झाली होती. बस पुढे जाऊ शकत नव्हती कारण पुढचा मार्ग फारच निसरडा झाला होता व त्याच्या जवळून जाणाऱ्या नदीत एक पर्यटनासाठी आलेली दोन मुले वाहत जात होती.

बस मधील शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना शिस्तीने खाली उतरवले. राहूलने पाहिले जर वाहत जाणाऱ्या मुलांना तात्काळ मदत केली नाही तर त्या दोन मुलांच्या जीवाला धोका निर्माण होणार होता. राहूल हा पट्टीचा पोहणारा होता. राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत प्रथम पारितोषक विजेता होता. त्यानी सरांची परवानगी घेतली आणि धबधब्याच्या ठिकाणाहून जोरदार वाहणाऱ्या पाण्यात उडी घेतली व बुडणाऱ्याच्या मदतीला तो पोहत पोहत पोहचला. त्याने वाहत जाणाऱ्या मुलाला पाण्याच्या प्रवाहातून बाहेर काढले व परत दुसऱ्या मुलाला वाचवण्यासाठी गेला. तोपर्यंत पाण्याचा प्रवाह वाढला होता. बघ्यातील एका व्यक्तीने गाडीतून दोरखंड पाण्यात सोडला. राहूल त्या दोरखंडासह दुसऱ्या बुडणाऱ्या मुलापर्यंत पोहचला व दोघेही इतर लोकांच्या मदतीने मोठ्या अथक प्रयत्नाने बाहेर आले.

पर्यटनाला जाताना प्रत्येकांनी काळजी घेतली पाहिजे. पाण्याचा प्रवाह व धबधबे या ठिकाणी जपून वागले पाहिजे. गाडीचा वेग मर्यादित ठेवला पाहिजे. राहूलच्या प्रसंगावधाने दोन मुलांचा जीव वाचला होता. कामगिरीची दखल जिल्हा प्रशासनाने घेतली व त्याला राष्ट्रीय बाल पुरस्काराने सन्मानित केले व ती सहल सर्वांचीच अविस्मरणीय झाली.

**(इ) लेखनकौशल्य (१०० ते १२० शब्द).**

**खालील लेखनप्रकारंपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **[८]**

**(1) प्रसंगलेखन.**

**✲ (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

उत्तर: **जनता विद्यालय खेळमहोत्सव**

शालेय जीवनातील एक महत्त्वाचा दिवस म्हणजे शाळेतील क्रीडा महोत्सव. आमच्या जनता विद्यालयाचा क्रीडा महोत्सव म्हणजे एक मोठा आनंद मेळाच असतो. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेचे सर्व विद्यार्थी, पालक व शिक्षक सर्व एकाच दिवशी शाळेच्या भव्य पटांगणात उपस्थित असतात.

२४ डिसेंबर या दिवशी म्हणजे नाताळची सुट्टी सुरू होणार त्या शाळेच्या शेवटच्या दिवशी पारितोषिक वितरण समारंभाचे दरवर्षी आयोजन केले जाते. फूटबॉल, क्रिकेट या सांधिक खेळाबरोबर भालाफेक, उंच उडी, लांब उडी, धावणे, थाळी फेक अशा विविध स्पर्धांचे आयोजन खेळ महोत्सवात केले होते व या स्पर्धेत पहिल्यांदाच मला उंच उडी स्पर्धेत प्रथम पारितोषिक प्राप्त झाले होते. जणुकाही माझ्या जीवनातील ही पहिलीच यशाची उंच उडी होती.

शाळेच्या भव्य पटांगणात एक सभा मंडप उभारले होते. प्रवेशद्वाराजवळ आकर्षक रोषणाई व सभामंडप फुलांनी सजवलेले होते. पालक व विद्यार्थ्यांना बसण्यासाठी वेगवेगळी व्यवस्था केली होती. त्याचबरोबर पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांना वेगळी आसन व्यवस्था केली होती. पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांच्या रांगेत स्वयंसेवकांनी मला सन्मानाने बसवले गेले. त्या प्रसंगी माझा उर अभिमानाने भरून आला. मंचकावर शाळेचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक व सन्मानीय व्यवस्थापक बसले होते. या कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त क्रीडापटू अभय राठोड उपस्थित होते. पारितोषिक वितरण प्रसंगी आदरणीय पाहुण्यांनी समयोचित भाषणे केली. प्रमुख पाहुणे अभय राठोड यांनी शालेय जीवनात खेळाचे महत्त्व स्पष्ट करून सांगितले.

प्रमुख पाहुण्याच्या हस्ते मला सुवर्णपदक व प्रमाणपत्र देण्यात आले. हा दिवस माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय दिवस ठरला.

**(२) आत्मकथन:**

✲ **(प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

उत्तर: **सैनिकाचे आत्मकथन**

शालेय जीवनातच मला देशसेवेची व समाजसेवेची आवड होती याचे कारण माझे वडील भारतीय सेनेत होते. मी इतर विद्यार्थ्यांप्रमाणेच सर्वसामान्य मुलांबरोबर खेळ, मस्ती

साली राष्ट्रीय साक्षरता मिशनची सुरुवात झाली. साक्षरतेची देशाला गरज आहे कारण समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी तसेच सावकारांकडून होणारी गोर-गरीब, अडाणी शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी व शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी साक्षरतेची गरज आहे. साक्षरतेमुळे बालमजुरी, अल्पवयीग गुन्हेगारी, फसवणूक, निरक्षरता, अज्ञान दूर होऊन विज्ञाननिष्ट दृष्टीकोण निर्माण होईल.

ग्रामीण विभागात साक्षरतेची गरज आहे कारण आपला देश कृषीप्रधानदेश आहे. नवनवीन शेतीतीत प्रयोग, खते, बी-बियाणेची माहिती, शेतीचा बाजारभाव यांची माहिती साक्षरतेमुळेच प्राप्त होऊ शकतो म्हणून साक्षरता अभियान ग्रामीण भागातून केले पाहिजे. जर शेतकरी सुखी-समृद्ध झाला तर देश समृद्ध होईल. वाढत्या तंत्रज्ञान आणि विकासामुळे साक्षरता हा जीवनाचा भाग बनला आहे. ज्ञानाचा अफाट भांडारा साक्षरतेमुळे सर्वांसाठी खुला होऊ शकतो.

साक्षरता प्रसारासाठी जनजागृती केली पाहिजे. विविध योजना राबविल्या पाहिजे. मोफत पुस्तके, शिष्यवृत्ती, अनुदान दिले पाहिजे. महिला साक्षरता, प्रौढ शिक्षण यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. साक्षरतेमुळे केवळ पुस्तकी ज्ञान मिळणार नाही तर जीवन राहणीमान सुधारेल, आरोग्य सुधारेल, हक्काची जाणीव होईल, भ्रष्टाचार निर्मुलन होईल. शिक्षणच माणसाला माणुसकीच्या दिशेने घेऊन जाईल. निरक्षरता हा देशाला लागलेला शाप आहे. शिक्षण-विकास, आरोग्य आणि प्रगतीसाठी साक्षरता आभियानाची गरज आहे. आठ सप्टेंबर हा दिवस जागतिक साक्षरता दिवस म्हणून साजरा केला जातो. साक्षरता अभियान राबवून लवकर आपल्या देशातील साक्षरतेचे प्रमाण वाढून भारत देश सर्वच क्षेत्रात नावलौकिक प्राप्त करेल यात शंका नाही.

★★★